आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार, दिनांक ११ जून २०२४

ठळक बातम्या

1. केंद्रातल्या नवनियुक्त मंत्र्यांनी आज स्वीकारला पदाचा कार्यभार.

2. नीट परीक्षेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाची राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस- परीक्षेच्या प्रतिष्ठेवर परिणाम झाल्याचं न्यायालयाचं निरीक्षण.

3. पुढील शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना वर्षातून दोनदा प्रवेश देण्याची मुभा- विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय.

4. सुदृढ लोकशाहीसाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष सारखेच महत्वाचे-कार्यकर्ता विकास वर्ग द्वितिय समापन समारोहात सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांचं प्रतिपादन.

*****

मंत्रिमंडळ खातेवाटप

केंद्रातल्या नव्या मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झाल्यानंतर आज नवनियुक्त मंत्र्यांनी आपापल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ.एस.जयशंकर यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रीपदाचा कार्यभार हातात घेतला. अश्विनी वैष्णव यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रीपदाची तर, डॉ.एल.मुरुगन यांनी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्रीपदाची सूत्रं हातात घेतली. हरदीप सिंह पुरी यांनी पेट्रोलियम आणि वायू मंत्री म्हणून तर, सुरेश गोपी यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून पदभार सांभाळला. गिरिराज सिंह यांनी माजी वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत वस्त्रोद्योग मंत्रालयाचं काम हाती घेतलं. पवित्र मार्गारिटा यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली. लोक जनशक्ती पक्ष-रामविलास पासवान पक्षाचे नेते चिराग पासवान यांनी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री म्हणून पदभार स्वीकारला. किरेन रिजिजू यांनी संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक मंत्री म्हणून तर, मनोहर लाल यांनी केंद्रीय ऊर्जामंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला. जितेंद्र सिंह यांनी कर्मचारी आणि प्रशिक्षण विभागाचे राज्यमंत्री, स्वतंत्र प्रभार म्हणून पदभार हाती घेतला. जयंत चौधरी यांनी कौशल्य विभाग आणि स्वयं-उद्योजकता विभागाचे मंत्री म्हणून कामाला सुरुवात केली. राजनाथ सिंह यांनी संरक्षण मंत्री म्हणून तर, संजय सेठ यांनी या खात्याचे राज्यमंत्री म्हणून कामकाज पाहण्यास सुरुवात केली.

## योग

योग आपल्याला शांततेनं आणि धैर्यानं जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम बनवत असं सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येकानं योगाला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याचं आवाहन केलं आहे. आपल्या एक्स या समाज माध्यमावरील संदेशात पंतप्रधान म्हणाले कि "दहा दिवसांनंतर जग दहावा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करेल, हा एक कालातीत सराव आहे जो जगभरातील लाखो लोकांमध्ये एकता आणि सुसंवाद साजरा करेल. योगानं सांस्कृतिक आणि भौगोलिक सीमा ओलांडल्या आहेत आणि जगभरातील लाखो लोकांना सर्वांगीण कल्याणासाठी एकत्र केलं आहे." आगामी योग दिनाच्या निमित्त्यानं, विविध आसन आणि त्यांचे फायदे याबद्दल मार्गदर्शन सामायिक असलेला एक व्हिडिओ देखील पंतप्रधानांनी शेअर केला.

## धन्यवाद यात्रा

उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेस पक्ष आजपासून राज्यातील सर्व ४०३ विधानसभांमध्ये 'धन्यवाद यात्रा' काढणार आहे. काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी आणि काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी-वाद्रा हे पक्षाच्या या मोहिमेचा शुभारंभ करतील आणि रायबरेली आणि अमेठीच्या जनतेला सार्वत्रिक निवडणुकीत पाठिंबा दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतील. या यात्रेत रायबरेलीच्या भुयेमाऊ परिसरात ते सभेला संबोधित करतील. १५ जूनपर्यंत धन्यवाद यात्रा सुरू राहणार असून, राष्ट्रीय सरचिटणीस आणि राज्याचे प्रभारी, अविनाश पांडे आणि प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अजय राय यांच्या अध्यक्षतेखाली, काल लखनौमध्ये झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

## नीट

राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा अर्थात नीट रद्द करण्याच्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयानं एन.टी.ए.ला नोटीस बजावली असून, न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठानं पुढील सुनावणी आठ जुलै रोजी ठेवण्याचे आदेश दिले. अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षेतील हेराफेरीचा आरोप केल्यानं परीक्षेच्या प्रतिष्ठेवर परिणाम झाल्याचं सर्वोच्च न्यायालयान म्हटलं आहे. मात्र, खंडपीठानं समुपदेशनाला तूर्तास स्थगिती देण्यास नकार दिला. आंध्र प्रदेशातील अब्दुल्ला मोहम्मद फैज आणि इतरांनी पाच मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करून परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली आहे. तसंच, एस.आय.टी.मार्फत तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय चार जून रोजी जाहीर झालेल्या निकालाच्या आधारे, समुपदेशनावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात दुसरी याचिका शिवांगी मिश्रा आणि इतर विद्यार्थिनींनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे.

यामध्ये NEETचे नव्यानं आयोजन करण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे परीक्षेतील हेराफेरीचा आरोप हा मोठा मुद्दा राहिला. दरम्यान एन.टी.ए. या NEET चे आयोजन करणाऱ्या संस्थेनं, पेपर लीक किंवा परीक्षेत हेराफेरीचे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत.

मुंबई पोलीस भरती

मुंबई पोलीसांची २०२१ची भरती प्रक्रीया पूर्ण करण्याची मागणी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या, खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. मुंबई पोलिसांच्या २०२१च्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची कागदपत्रे आणि पोलीस पडताळणी पुर्ण झाली आहे. आता केवळ वैद्यकीय तपासणी करुन त्यांना नियुक्ती देणे बाकी आहे. या उमेदवारांची मुळ कागदपत्रे समांतर आरक्षणामुळ जमा करुन घेतली आहेत. त्यामुळ हे उमेदवार इतरत्र अर्ज देखील करु शकले नाहीत. हि प्रक्रिया अतिशय संथगतीनं सुरु आहे. परिणामी या उमेदवारांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. ही अतिशय गंभीर बाब असून, शासनानं या उमेदवारांना तातडीनं नियुक्ती देण्याची गरज आहे. राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची दखल घेऊन हि प्रक्रिया तातडीनं पुर्ण करावी अशी मागणी, सुळे यांनी एक्स या समाजमाध्यमातून केली आहे.

विधान परिषद निवडणूक

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या, शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी, छाननीनंतर एकंदर ८८ उमेदवारांचे अर्ज, वैध ठरले आहेत. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा चार जागांकरता येत्या २६ जून रोजी मतदान होणार आहे. उद्यापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील तर एक जुलैला मतमोजणी होणार आहे.

युजीसी

विद्यापीठ अनुदान आयोगानं अर्थात यु.जी.सी., पुढील शैक्षणिक वर्षापासून उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना वर्षातून दोनदा प्रवेश देण्याची मुभा देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. सध्या UGC नियमानुसार, वर्षातून एका शैक्षणिक सत्रात प्रवेश देण्याची परवानगी असून, बोर्डाचे निकाल जाहीर होण्यास उशीर, आरोग्य समस्या आणि इतर वैयक्तिक कारणांमुळ प्रवेश गमावलेल्या विद्यार्थ्यांना, याचा फायदा होईल, असं UGCचे अध्यक्ष प्राध्यापक ममिदला जगदेश कुमार म्हणाले. या निर्णयामुळ चालू वर्षात प्रवेश चुकलेल्या विद्यार्थ्यांना आता पूर्ण एक वर्ष प्रतीक्षा करावी लागणार नाही असंही ते म्हणाले.

मोहन भागवत

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे कार्यकर्ता विकास वर्ग, द्वितिय समापन समारोहाचं आयोजन काल सायंकाळी नागपुरच्या रेशीमबाग इथ करण्यात आलं होत. या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत तसंच  महंत श्रीरामगिरी महाराज उपस्थित होते. 'सुदृढ लोकशाहीसाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष दोन्ही तितकेच महत्त्वाचे असून, राजकारण सहमतीनं चाललं पाहिजे' असं प्रतिपादन, भागवत यांनी यावेळी केलं. विविधतेतील एकता हीच आपली ओळख आहे. आपण परस्परांच्या धार्मिक भावनांचा आदर केला पाहिजे. मणिपूर मागील एक वर्षांपासून पेटलं असून, ते शांत करण्यास प्राथमिकता द्यायला हवी असंही ते म्हणाले. मे महिन्यात सुरू झालेल्या, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांसाठी, महिनाभर चाललेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात, देशभरातील ९०० हून अधिक स्वयंसेवक सहभागी झाले होते.

हॉकी यजमानपद

भारत हा आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या, पुरुष कनिष्ठ विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भूषविणार आहे. स्वित्झर्लंडमधील लॉसेन इथल्या आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनच्या कार्यकारी मंडळानं हा निर्णय घेतला आहे. ही स्पर्धा डिसेंबर २०२५ मध्ये होणार आहे. ज्युनियर विश्वचषक स्पर्धेत, २४ संघांचा समावेश होण्याची ही पहिलीच वेळ असून, यापूर्वी या स्पर्धेचं आयोजन, २०२३ मध्ये मलेशिया इथ झालं होत आणि जर्मनीनं यात विजय प्राप्त केलं होता.

पीक विमा

पंतप्रधान पिक विमा योजना-खरीप हंगाम सन २०२४-२५ अंतर्गत सर्व समावेशक, पिकविमा योजनेत धान आणि सोयाबिन हि दोन पिकं, भंडारा जिल्ह्यामध्ये अधिसूचित आहे. अधिसूचित क्षेत्र हे महसूल मंडळ निश्चित करण्यात आलं असून, जिल्हयाकरीता चोलामंडलम, एम.एस.जनरल इन्सुरंस कं.लि. ही वीमा कंपनी निश्चित झाली आहे. या योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा असं जिल्हा कृषि अधिक्षक संगिता माने यांनी आवाहन केलं आहे. पीक विमा योजने अंतर्गत, पिकांच्या काढणीनंतर शेतात पसरवून अथवा पेढया बांधून सुकवणीस ठेवलेले अधिसूचित पिक, जर गारपिट, चक्रिवादळामुळ आलेला अथवा बिगर मोसमी पाऊस यामुळ बाधीत झाल्यास, वैयक्तिक स्तरावर पंचनामे करून, नुकसान भरपाई निश्चित करण्यात येते. अर्ज करण्याची अंतिम मुदत, १५ जुलै आहे.

## दत्तक विधान प्रक्रिया

बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०१५ आणि सुधारीत २०२१ तसंच दत्तक नियमावली २०२२ नुसार बालकांना दत्तक घेण्यासाठी सुधारीत नियमावली जाहीर करण्यात आली आहे. नियमावलीनुसार बाळ दत्तक घेण्यासाठी भावी दत्तक माता ही शारीरिक, मानसिक, भावनात्मक आणि आर्थिक स्वरूपात सक्षम असणे तसंच सदर दत्तक विधान प्रक्रियेसाठी दोन्ही पती-पत्नी यांची सहमती असणे आवश्यक आहे. एकल पुरुष फक्त बालकाची निवड करु शकतात. दत्तक विधानामार्फत बाळ घेऊ इच्छिणाऱ्या भावी माता-पिता यांनी, cara.wed.gov.in या पोर्टलवर अर्ज करावा किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी कार्यालयात भेट द्यावी.

## हवामान

नैर्ऋत्य मोसमी पाऊस येत्या दोन दिवसांत उत्तर अरबी समुद्र, गुजरात आणि महाराष्ट्राच्या काही भागांत पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि कर्नाटकात पुढचे चार ते पाच दिवस वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता असल्यानं या भागांना हवामान विभागानं रेड अलर्ट दिला आहे. दरम्यान, पूर्व विदर्भात काल सरासरी तापमान ४० अंश सेल्सिअसच्या आसपास होत. सर्वाधिक कमाल तापमान यवतमाळ इथं ४१ पुर्णाक पाच अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं. काल पश्चिम विदर्भात बुलढाणा, अकोला, अमरावती आणि वाशीम इथं पाऊस झाला तर बुलढाण्यातील देऊळगाव राजा इथं, ४५ पूर्णांक सहा मिलीमीटर पावसाची नोंद करण्यात आली.

*****